जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४५१ दिनांक - २१/०६/२०२३

**भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर**

# दरोडयाच्या गुन्हयात फरार असलेल्या मुख्य आरोपीस केले जेरबंद

दिनांक २४/०५/२०२३ रोजी फिर्यादी हे त्यांचे दुकानामध्ये काम करीत असताना इसम नामे अजय पांचाळ, तेजस वाडेकर, सोहेल आसंगी, गोविंद लोखंडे, सोन्या कांबळे, अमोल ढावरे यांनी दुकानामध्ये येवुन फिर्यादी व मॅनेजर यांना शिवीगाळ करुन अजय पांचाळ याने फिर्यादी यांचे दुकान मालकांना फोन करुन मी अजय पांचाळ असुन मी आताच जेल मधुन बाहेर सुटुन आलोय, तुला आलोय कळत नाही का हप्ता चालु करायाचा नाही का अशी धमकी दिली. त्यानंतर त्यांनी फिर्यादी यांचे दुकानातील बाटल्या, थंड पेयाच्या बाटल्या, काचेचे ग्लास,दगड फेकुन दुकानातील दारुच्या बाटल्या, टीव्हीचे नुकसान केले. त्यानंतर अजय पांचाळ याने दुकानातील काऊंन्टर मधील असलेले दहा हजार रूपये जबरदस्तीने घेवुन दुकानाचे बाहेर येवुन दगडी फेकुन आरडओरड केली आहे म्हणुन फिर्यादी यांनी दिनांक २४/०५/२०२३ रोजी तक्रार दिल्याने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३२६/२०२३, भादंवि कलम ३८५,३९२,५०४,५०६,४२७, क्रिमीनल अमेंन्टमेंन्ट ॲक्ट कलम ७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

दाखल गुन्हयामध्ये आरोपी **१.**सोहेल मोदीन आसंगी,.**२**.अमोल तानाजी ढावरे .**३**.आदित्य ऊर्फ सोन्या खंडु कांबळे, यांना अटक करण्यात आली असुन, गुन्हयामध्ये आरोपी अजय पांचाळ हा मिळुन येत नव्हता. त्यानुसार गुन्हयातील पाहीजे आरोपीतांचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार **अभिजीत जाधव, विक्रम सावंत** यांचे गोपनीय बातमीदारांचे मार्फतीने पाहीजे आरोपी **१. अजय पांचाळ, वय २३ वर्षे, रा. शनिनगर, आंबेगाव बु, पुणे** याचा शोध घेवुन त्यास अटक केली आहे. आरोपी अजय पांचाळ हा रेकॉर्डवरील आरोपी असुन तो भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथील गंभीर दुखापतीच्या गुन्हयामध्ये मागील सहा महीन्यापासुन मिळुन येत नव्हता.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुकत, पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे शहर, श्री.प्रविण पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,पुणे शहर श्रीमती स्मार्तना पाटील मा. मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विजय कुंभार, तसेच पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, सचिन धामणे, पोलीस उप निरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार अभिजीत जाधव,विक्रम सावंत, शैलेश साठे, चेतन गोरे, निलेश ढमढेरे, मंगेश पवार, हर्षल शिंदे, अवधुत जमदाडे, सचिन सरपाले, सचिन गाडे, धनाजी धोत्रे, निलेश खैरमोडे, अभिनय चौधरी, नितीन जाधव, राहुल तांबे यांच्या पथकाने केली आहे.